लोकमत

# माहितीच्या सुरक्षेसाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक

## एन. बी. दहीभाते; विद्यापीठात राष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वेब सामग्री, माहितीची सुरक्षितता टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान असणार आहे. त्यादृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन नॅशनल केमिकल लॅबोरेटरीच्या ग्रंथालयाचे निवृत्त प्राचार्य तथा तांत्रिकी अधिकारी डॉ. एन. बी. दहीभाते यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते. 'इमर्जिंग ट्रेंडस अँड टेक्नॉलॉजीज इन लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स' असा परिषदेचा विषय होता.

डॉ. दहीभाते म्हणाले, आयसीटी आणि इतर अनेक तंत्रज्ञानामुळे ई-लर्निंग प्रक्रिया पूर्णपणे व्यवस्थापित करणे शक्य झाले आहे. आयसीटीमध्ये ट्युटोरिअल, ट्यूशन्स, ट्यूटर, टेक्स्ट, टेस्ट, टेक्नॉलॉजी, टूल्स आणि टीचिंग या आठ 'टी' पद्धतींचा समावेश होतो. वापरकर्ते तंत्रज्ञानामध्ये अधिक प्रवीण आहेत; त्यामुळे त्यांच्या समस्यांना तोंड देण्यासाठी आपणास सातत्याने अद्ययावत होणे आवश्यक आहे. कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, बदलत्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि मानसिकता बदल ही ग्रंथालय आणि माहिती विज्ञानापुढील मूलभूत आव्हाने आहेत. या कार्यक्रमास यावेळी ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. एन. बी. खोत, डॉ. पी. जी. तडसद, के. विरनजेनिल्यू, आदी उपस्थित होते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांनी स्वागत केले. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले.

### 'शोधगंगा'वरील शोधप्रबंधांचे लोकार्पण

**सन १९६४ ते २०१८च्या अखेरपर्यंत शिवाजी विद्यापीठास सादर झालेले ३४९६ शोधप्रबंध 'इन्फ्लिबनेट'च्या 'शोधगंगा' या राष्ट्रीय रिपॉझिटरी पोर्टलवर उपलब्ध करुन दिले आहे. त्यांचे कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते औपचारिक लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रोक्वेस्ट या कंपनीचे दास, आनंदिता सेनगुप्ता, सचिन मोरे उपस्थित होते.**

जनसंपर्क कक्ष

17 MAR 2019

लोकमत

# माहितीची सुरक्षितता टिकवण्याचे आव्हान

## डॉ. एन. बी. दहीभाते यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वेब सामग्री, माहितीची सुरक्षितता टिकवून ठेवणे हे नजीकच्या काळात मोठे आव्हान आहे. त्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ग्रंथालयाचे निवृत्त प्राचार्य तथा तांत्रिकी अधिकारी डॉ. एन. बी. दहीभाते यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात 'इमर्जिंग ट्रेंड्स् अँड टेक्नॉलॉजीज् इन लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषद झाली. त्यावेळी डॉ. दहीभाते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.डी. टी.शिर्के प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, बदलत्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि मानसिकता बदल ही ग्रंथालय आणि माहिती विज्ञानापुढील मूलभूत आव्हाने आहेत. आपल्या देशामध्ये दीडशे कोटी मोबाईल असून पंचाऐंशी टक्के वापरकर्ते आहेत. ई-लर्निंगच्याही पुढे जाऊन आता आता एम-लर्निंगचा जमाना आला आहे. दररोज किमान तीन तास मोबाईलचा वापर केला जात आहे. अशा वेळी, आपण विशिष्ट प्रकारचे सॉफ्टवेअर तयार करावे, जेणे करून वापरकर्ते मोबाईलद्वारे लायब्ररीमधील ज्ञान आणि संसाधनांचा उपयोग संशोधनासाठी करतील.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांनी स्वागत केले. ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. एन. बी. खोत यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले. यावेळी अक्कमहादेवी महिला विद्यापीठ, विजापूरचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी.जी.तडसद, पी.जे.टी.एस. कृषी विद्यापीठ, हैदराबादचे ग्रंथपाल डॉ. के. विरनजेनिल्यू आदी उपस्थित होते.

### 'शोधगंगा'वरील शोधप्रबंधांचे लोकार्पण

१९६४ ते २०१८च्या अखेरपर्यंत शिवाजी विद्यापीठास सादर करण्यात आलेले ३४९६ शोधप्रबंध 'इन्फ्लिबनेट'च्या 'शोधगंगा' या राष्ट्रीय रिपॉझिटरी पोर्टलवर उपलब्ध करण्यात आले आहेत. यावेळी त्याचे कुलगुरू शिंदे यांच्या हस्ते औपचारिक लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रोक्वेस्ट या कंपनीचे दास, आनंदिता सेनगुप्ता व सचिन मोरे आदी उपस्थित होते.

लोकमत

# ‘शोधगंगा’वर पीएच. डी.चे ३४९६ प्रबंध उपलब्ध

## शिवाजी विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्राचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाला गेल्या वर्षअखेरपर्यंत सादर झालेले एकूण ३४९६ शोधप्रबंध ‘इन्फ्लिबनेट’च्या‘शोधगंगा’ या राष्ट्रीय संकेतस्थळावर उपलब्ध झाले आहेत. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या माध्यमातून आज, बुधवारी आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत या प्रबंधांचे औपचारिक लोकार्पण होणार आहे, अशी माहिती ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी दिली.



**“ या उपक्रमामुळे विद्यापीठाकडील संशोधकीय ज्ञान जगभरातील संशोधकांना आता खुले झाले आहे. विद्यापीठात गेल्या ५५ वर्षांत विविध विषयांवर मौलिक संशोधन झाले आहे. त्याचा नवसंशोधकांना संदर्भसाहित्य म्हणून मोलाचा लाभ होणार आहे. विशेष म्हणजे राज्यात अशाप्रकारे सर्व शोधप्रबंध अपलोड करणारे शिवाजी विद्यापीठ हे तिसरे विद्यापीठ ठरले आहे.**

**- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

या ज्ञानस्रोत केंद्राकडे उपलब्ध असणाऱ्या सन १९६४ पासून २०१८ पर्यंतच्या ३४९६ पीएच. डी. प्रबंधांचे डिजिटायझेशन करून ते ‘इनफ्लिबनेट’च्या ‘शोधगंगा’ रॅंड्ढॉल्र्लॅ.ल्ला/ुल्ली३ॅ्ल्ल या संकेतस्थळावर अपलोड केले आहेत. विद्यापीठात झालेले संशोधन संशोधक, अभ्यासकांना उपयोगी पडावेत, या हेतूने विद्यापीठाने अहमदाबादच्या इन्फ्लिबनेट सेंटरशी २१ सप्टेंबर २०११ रोजी सामंजस्य करार केला. त्यांच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सन २०१२ मध्ये विद्यापीठाच्या डिजिटायझेशन प्रकल्पासाठी १९ लाख २६ हजार ६५० रुपयांचे अनुदान देण्यात आले. ‘शोधगंगा’ या संकेतस्थळावर प्रबंध विषयनिहाय पाहणे, वाचणे, डाऊनलोड करून घेणे, आदी सुविधा ज्ञानस्रोत केंद्राच्या संदर्भ विभागाद्वारे उपलब्ध करून दिल्या आहेत. या डिजिटायझेशनचे काम गुरगावच्या ‘प्रो-क्वेस्ट’ या संस्थेने केले आहे.

# वेबसामग्री सुरक्षिततेचे आव्हान

## डॉ. एन. बी. दहिभाते यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम

'वेबसामग्री, माहितीची सुरक्षितता टिकवून ठेवणे हे नजीकच्या काळात मोठे आव्हान असणार आहे. त्यादृष्टीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन नॅशनल केमिकल लॅबोरेटरीच्या (पुणे) ग्रंथालयाचे निवृत्त प्राचार्य तथा तांत्रिकी अधिकारी डॉ. एन. बी. दहिभाते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात 'इमर्जिंग ट्रेंडस् अँड टेक्नॉलॉजीज् इन लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेत डॉ. दहिभाते प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित होते.

डॉ. दहिभाते म्हणाले, 'औद्योगिक क्रांतीनंतर आताच्या युगात आयसीटी आणि इंटरनेट अधिक लोकप्रिय झाले आहेत. त्याच बरोबर दूरशिक्षण, ई-लर्निंग या औपचारिक शिक्षण प्रणाली पुढे आल्या. आयसीटी आणि इतर अनेक तंत्रज्ञानामुळे ई-लर्निंग प्रक्रिया पूर्णपणे व्यवस्थापित करणे शक्य झाले आहे. आयसीटीमध्ये ट्युटोरियल, ट्यूशन्स, ट्यूटर, टेक्स्ट, टेस्ट, टेक्नॉलॉजी, टूल्स् आणि टिचिंग या आठ 'टी' पद्धतींचा समावेश होतो. वापरकर्ते तंत्रज्ञानामध्ये अधिक माहीतगार आहेत. त्यामुळे त्यांच्या समस्यांना तोंड देण्यासाठी आपणास सातत्याने अद्ययावत होणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'बदलत्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण आणि मानसिकता बदल ही ग्रंथालय आणि माहिती विज्ञानापुढील मूलभूत आव्हाने आहेत. आपल्या देशामध्ये दीडशे कोटी मोबाइल असून ८५ टक्के वापरकर्ते आहेत. ई-लर्निंगच्याही पुढे जाऊन आता आता एम-लर्निंगचा जमाना आला आहे. दररोज किमान तीन तास मोबाइलचा वापर केला जात आहे. अशा वेळी, आपण विशिष्ट प्रकारचे सॉफ्टवेअर तयार करावे, जेणे करून वापरकर्ते मोबाइलद्वारे लायब्ररीमधील ज्ञान आणि संसाधनांचा उपयोग संशोधनासाठी करतील.'

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. शालिनी लिहितकर यांनी स्वागत केले. ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. एन. बी. खोत यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार यांनी आभार मानले. या परिषदेत अक्कमहादेवी महिला विद्यापीठ, विजापूरचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. जी. तडसद, पी. जे. टी. एस. कृषी विद्यापीठ, हैदराबादचे ग्रंथपाल डॉ. के. विरनजेनिल्यू यांच्यासह विविध ठिकाणचे ९० हून अधिक सदस्य सहभागी झाले.



# शिवाजी विद्यापीठाचे शोधप्रबंध क्लिकवर

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाला सादर करण्यात आलेले १९६४ पासून आजपर्यंतचे सर्व ३४९६ शोधप्रबंध 'इन्फ्लिबनेट'च्या 'शोधगंगा' या राष्ट्रीय संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिषदेत या प्रबंधांचे औपचारिक लोकार्पण करण्यात आल्याची माहिती ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत यांनी आज दिली. यावेळी प्रो-क्वेस्ट कंपनीचे प्रताप दास, आनंदिता सेनगुप्ता व सचिन मोरे उपस्थित राहणार आहेत

डॉ. नमिता खोत म्हणाल्या, 'शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राकडे उपलब्ध असणाऱ्या सन १९६४ पासून २०१८पर्यंतच्या ३४९६ पीएचडी प्रबंधांचे डिजिटायझेशन करून ते 'इनफ्लिबनेट'च्या 'शोधगंगा'



## ३४९६ शोधप्रबंध 'इन्फ्लिबनेट'च्या संकेतस्थळावर

या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले आहेत. शिवाजी विद्यापीठात झालेले संशोधन संशोधक, अभ्यासकांना उपयुक्त व्हावेत, या हेतूने विद्यापीठाने अहमदाबादच्या इन्फ्लिबनेट सेंटरशी २१ सप्टेंबर, २०११ रोजी सामंजस्य करार केला. या कराराच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग (नवी दिल्ली) यांच्याकडून सन २०१२मध्ये विद्यापीठाच्या डिजिटायझेशन प्रकल्पासाठी १९ लाख, २६ हजार, ६५० रुपये अनुदान देण्यात आले. शोधगंगा या संकेतस्थळावर हे प्रबंध विषयनिहाय पाहणे, वाचणे, डाउनलोड करून घेणे आदी सुविधा ज्ञानस्रोत केंद्राच्या संदर्भ विभागाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.या डिजिटायझेशनच्या कामात उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांच्यासह वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक व संदर्भ विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र खामकर व ग्रंथालय मदतनीस रवींद्र बचाटे यांचे सहकार्य मिळाले.

> विद्यापीठात गेल्या ५५ वर्षांत विविध विषयांवर मौलिक संशोधन झाले आहे. त्याचा नवसंशोधकांना संदर्भसाहित्य म्हणून मोलाचा लाभ होणार आहे. राज्यात अशा प्रकारे सर्व शोधप्रबंध अपलोड करणारे शिवाजी विद्यापीठ हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्यानंतर तृतीय स्थानावर आहे.
>
> डॉ. देवानंद शिंदे,
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# भारत-श्रीलंकेच्या संस्कृती, परंपरेत साम्य : प्रा. ब्रेशील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशांतील परंपरा आणि संस्कृतीमध्ये कमालीचे साम्य आहे, असे मत श्रीलंकेतील साबरगामुआ विद्यापीठातील प्रा. ब्रेशील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने बुधवारी अयोजित 'आंतरसंस्कृती संवाद' या विषयावर ते मार्गदर्शन करत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या.

प्रा. ब्रेशील म्हणाले, भारतीय आर्यभाषेतूनच सिंहली या भाषेचा जन्म झाला. सिंहलीवर संस्कृतचा मोठा प्रभाव आहे. किंबहुना, मराठीतील 'भोजन'सारखे अनेक शब्द सिंहलीमध्ये आहेत. भारतातील सण, उत्सव श्रीलंकेतही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.

श्रीलंकेत ७० टक्क्यांहून अधिक बौद्धधर्मीय लोक आहेत. याशिवाय, हिंदू, ख्रिश्चन, इस्लाम आदी धर्मांचे लोकही आहेत. या सर्वांमध्ये धार्मिक सलोखा आहे. देशात कधीही धार्मिक कलह होत नाहीत. बौद्ध धर्माचा प्रसारही भारतातूनच झाला. गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान भारतातच उगम पावले आणि नंतर त्याचा श्रीलंकेत प्रसार झाला. त्यामुळे श्रीलंकेचे भारताशी धार्मिक आणि संस्कृतिक बंध घट्ट आहेत.

शेती हा श्रीलंकेत प्रमुख व्यवसाय आहे. चहाची शेती, मसाल्यांचे पदार्थ, कांदा, लसूण आदी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. पर्यटन हा उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. श्रीलंका छोटा देश असला, तरी नैसर्गिकदृष्ट्या तो अत्यंत समृद्ध आहे. येथील लोक पर्यावरणाची काळजी घेतात. त्यामुळे देशात जैवविविधता टिकून आहे, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

## चाहते आहेत; पण हुल्लडबाज नाहीत

भारतीय चित्रपटांना श्रीलंकेत खूप पसंती आहे. आघाडीचे अभिनेते आणि अभिनेत्रींचे अनेक चाहते आहेत. चित्रीकरणाच्या निमित्ताने काही अभिनेते श्रीलंकेत येतात; परंतु श्रीलंकन नागरिक त्यांच्या मागे लागून पाहण्यासाठी गर्दी करत नाहीत. ते चाहते असले, तरी अभिनेत्यांचा सन्मान करतात. अजिबात हुल्लडबाजी करत नाहीत, असे प्रा. ब्रेशील म्हणाले.

## क्रिकेटर सामान्य जीवन जगतात

श्रीलंका क्रिकेटप्रेमींचा देश आहे. या देशाने अनेक चांगले खेळाडू दिले. निवृत्तीनंतर हे खेळाडू अत्यंत सामान्य जीवन जगत आहेत. स्वतःची कामे ते स्वतः करतात. सकाळी व्यायामाला आल्यानंतर लोक त्यांच्याभोवती जमत नाहीत. मुलांना शाळेत सोडण्यापासून ते पालक मीटिंगला उपस्थित राहण्यापर्यंतची सर्व काम अत्यंत सामान्यपणे ते करताना दिसतात, असे प्रा. ब्रेशील म्हणाले.

Kolhapur Edition
7 Mar, 2019 Page No. 11
Powered by : erelego.com

F17 MAR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बुद्धांमुळे श्रीलंकेचे भारताशी धार्मिक बंध

## श्रीलंका साबरगामुआ विद्यापीठातील प्रा. ब्रेशील यांचे प्रतिपादन : कोल्हापूरच्या लोकांकडून पर्यावरणाची जपणूक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

श्रीलंकेत ७० टक्क्यांहून अधिक बौद्ध धर्मिय लोक आहेत. गौतम बुद्धांचे तत्वज्ञान भारतातच उगम पावले आणि नंतर त्याचा श्रीलंकेत प्रसार झाला. त्यामुळे श्रीलंकेचे भारताशी धार्मिक आणि संस्कृतिक बंध घट्ट आहेत. असे प्रतिपादन श्रीलंकेतील साबरगामुआ विद्यापीठातील प्रा. ब्रेशील यांनी केले. याशिवाय हिंदू, ख्रिश्चन, इस्लाम आदी धर्माचे लोकही आहेत. देशात कधीही धार्मिक कलह होत नाही, या सर्वांमध्ये धार्मिक सलोखा आहे असे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. ब्रेशील.**

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभागाच्या वतीने अयोजित 'आंतर संस्कृती संवाद' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. निशा पवार होत्या.

प्रा. ब्रेशील म्हणाले, श्रीलंकेच्या संस्कृतीचे भारतीय संस्कृतीची बरेचसे साम्य आहे. भारतीय आर्यभाषेतूनच सिंहली या भाषेचा जन्म झाला. सिंहलीवर संस्कृतचा मोठा प्रभाव आहे. किंबहुना मराठीतील 'भोंजन' सारखे अनेक शब्द सिंहलीमध्ये आहेत. भारतातील सण, उत्सव श्रीलंकेतही मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. शेती हा श्रीलंकेत प्रमुख व्यवसाय असून चहाची शेती, मसाल्यांचे पदार्थआदी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. पर्यटन हा उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे अशी माहिती त्यांनी दिली. श्रीलंका छोटा देश असला तरी नैसर्गिकदृष्ट्या तो अत्यंत समृद्ध आहे. कोल्हापुरातील लोक पर्यावरणाची काळजी घेतात. त्यामुळे देशात जैवविविधता टिकून आहे, अशा शब्दांत त्यांनी कोल्हापुरचे कौतुक केले. विद्यापीठाच्या नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

**चाहते आहेत; पण हुल्लडबाज नाहीत...**

भारतीय चित्रपटांना श्रीलंकेत खूप पसंती आहे. चित्रीकरणाच्या निमित्ताने काही अभिनेते श्रीलंकेत येतात. परंतु, श्रीलंकेत नागरिक त्यांच्या मागे लागून पाहण्यासाठी गर्दी करत नाहीत. ते चाहते असले तरी अभिनेत्यांचा सन्मान करतात. अजिबात हुल्लडबाजी करत नाहीत, असेही प्रा. ब्रेशील यांनी सांगितले.

### क्रिकेट खेळाडू सामान्य जीवन जगतात

श्रीलंका हा क्रिकेटप्रेमींचा देश आहे. या देशाने अनेक चांगले खेळाडू दिले. निवृत्तीनंतर हे खेळाडू अत्यंत सामान्य जीवन जगत आहेत. स्वतःची कामे ते स्वतः करतात. सकाळी व्यायामाला आल्यानंतर लोक त्यांच्याभोवती जमत नाहीत. मुलांना शाळेत सोडण्यापासून ते पालक मिटींगला उपस्थित राहण्यापर्यंतची सर्व काम अत्यंत सामान्यपणे ते करताना दिसतात, असेही प्रा. ब्रेशील यांनी सांगितले.

# डीकेटीईमध्ये रविवारी पहिला पदवी प्रदान सोहळा

## एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**
येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल व इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये पहिला पदवी प्रदान सोहळा रविवार, दि. १० मार्च रोजी दुपारी ३.३० वा होणार आहे. एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, डीकेटीईचे उपाध्यक्ष व माजी मंत्री प्रकाश आवाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पदवी प्रदान सोहळा होणार आहे.

कल्लाप्पाणा आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली १९८२ साली महाराष्ट्रातील विनाअनुदानित तत्त्वावर सुरू झालेली डीकेटीई ही संस्था आज इंजिनिअरिंगच्या विविध शाखात शिक्षण देणारी एक यशस्वी संस्था म्हणून परिचित आहे. सन २०१६ साली आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक प्रगतीमुळे डीकेटीईला युनिर्व्हसिटी ग्रॅन्टस कमिशन (यूजीसी), नवी दिल्ली व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरकडून 'ॲटोनॉमस स्टेटस' दर्जा प्राप्त झाला आहे. त्यानंतर शैक्षणिक वर्ष



२०१७-१८ ला पदव्युत्तर, पदवी मिळालेल्या विद्यार्थ्यांची पहिली बॅच बाहेर पडली आहे.

डीकेटीईमध्ये एम.टेक. टेक्सटाईल टेक्नॉलॉजी, एम.टेक. टेक्निकल टेक्स्टाईल, एम.टेक.टेक्स्टाईल केमिस्ट्री, एम.टेक.इलेक्ट्रॉनिक्स, एम.टेक. मेकॅनिकल, एम. टेक. कॉम्प्युटर सायन्स, एमबीए व एमबीए टेक्स्टाईल असे एकूण ८ पदव्युत्तर अभ्यासक्रम आहेत. त्यामध्ये ११० विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. या सर्व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना या समारंभात पदवी बहाल करण्यात येणार आहे. यावेळी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवलेली पद्मश्री बरगे हिला सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

डीकेटीईमध्ये एकूण ११ पदवी कोर्सेस कार्यरत आहेत आजपर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभामध्ये बी.टेक. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत असे. पण ज्या संस्थेमध्ये विद्यार्थ्यांचे पदवी शिक्षण होते त्याच महाविद्यालयाशी त्याचे दृढ नाते असते. त्यामुळे त्या इन्स्टिट्यूटमध्ये येऊन पदवी प्राप्त करण्याचा वेगळा आनंद त्या विद्यार्थ्यांस मिळत असतो. या बाबी लक्षात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली व शिवाजी विद्यापीठ यांनी डीकेटीईसारख्या स्वायत्त संस्थाना २०१८-१९ वर्षापासून महाविद्यालयामध्येच पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार डीकेटीईतून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साली बी.टेक.-बी.ई. पदवी प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना देखील पदवी बहाल करण्यात येणार आहे. प्रथम क्रमांक प्राप्त बी. टेक. विद्यार्थ्यांना मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे डायरेक्टर डॉ. पी. व्ही. कडोले यांनी दिली.

डॉ. कडोले म्हणाले, डीकेटीईचे विद्यार्थी जगभरात डीकेटीईचे नाव विविध संस्थांमधून उज्ज्वल करताना दिसतात. पदवीप्राप्त या सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान व्हावा व आपल्या मातृसंस्थाबद्दल आत्मियता वाढावी, या उद्देशाने डीकेटीईच्या इतिहासातील पहिल्या पदवी प्रदान सोहळ्याचे आयोजन केले आहे.

या सोहळ्यास डीकेटीईचे सर्व विश्वस्त, बोर्ड ऑफ गव्हर्नस, ॲकॅडमिक कौन्सिल सदस्य, अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य, विद्या परिषदेचे सदस्य, शिवाजी विद्यापीठ प्रतिनिधी, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य व त्यांचे प्रतिनिधी यांच्या सवे डीकेटीईचे उपसंचालक, डॉ. यू. जे. पाटील, डॉ. एल. एस. आडमुठे, परिक्षा नियंत्रक डॉ. आर. ए. पाटील, सर्व डीन्स, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी आदी या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

लोकमत

# पत्रकारिता विभागात आजपासून परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने दोनदिवसीय राष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन विद्यापीठाच्या निलांबरी हॉलमध्ये आज, गुरुवारी सकाळी १० वाजता कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी डॉ. मृणाल चटर्जी यांनी संपादित केलेल्या 'महात्मा गांधी एक पत्रकार आणि संपादक' या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. विद्यार्थी संतोष चव्हाण याने तयार केलेल्या सुवर्णमहोत्सवी माहितीपट प्रदर्शित केला जाणार आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी दिली.

Hello Kolhapur
Page No. 8 Mar 07, 2019
Powered by: erelego.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-7 MAR 2019

पुढारी

# पत्रकारिता विभागात आजपासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने दि. ७ आणि ८ मार्च रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या निलांबरी हॉलमध्ये गुरुवारी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती विभागप्रमुख डॉ. नीशा मुडे-पवार यांनी दिली.

पत्रकारिता विभागाचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. यानिमित्त विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याचाच एक भाग म्हणून ही राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत श्रीलंका येथील साबरगामुआ विद्यापीठातील प्रा. ब्रेशील, ओरिसा येथील आयआयएमसीच्या विभागीय संचालक डॉ. मृणाल चटर्जी, म्हैसूर विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाच्या माजी प्रमुख डॉ. उषा राणी नारायण, हरियाणातील एसजीटी विद्यापीठाच्या जनसंवाद आणि माध्यम तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. संजीव भानावत आदी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन समारंभात डॉ. मृणाल चटर्जी यांनी संपादित केलेल्या 'महात्मा गांधी : एक पत्रकार आणि संपादक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. विद्यार्थी संतोष चव्हाण यांनी तयार केलेला सुवर्णमहोत्सवी माहितीपट प्रदर्शित केला जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
7 MAR 2019
पुढारी

# विद्यापीठात उद्या संगीत-नाटक महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि.८) संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन केले आहे.

पुण्याच्या प्रसिध्द शास्त्रीय गायिका सौ. मधुवंती देव यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी दहा वाजता या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

सकाळी ११ ते दुपारी १ या प्रथम सत्रात मधुवंती देव यांचे सहप्रयोग व्याख्यान व गायन होणार आहे. दुपारी २ ते ३ या दुसऱ्या सत्रात बुजुर्ग गायक अरुण कुलकर्णी यांचे गायन व त्यांचा सत्कार असा कार्यक्रम होणार आहे. तिसऱ्या सत्रात दुपारी ३ ते ४.३० या कालावधीत बारामतीचे नाट्य दिग्दर्शक अनिरुद्ध खुटवड यांचे नाटक व अभिनयातील मूलतत्वे या विषयांवर मार्गदर्शन होणार आहे.

या महोत्सवानिमित्त बबन माने व विद्यार्थ्यांच्या चित्रप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे.